प्रभात 20 मे 2012

# खुल्या अर्थव्यवस्थेच्या ऐश्वर्यातच मंदीची बीजे : डॉ जाधव



पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) - जागतिक आर्थिक मंदीच्या संकटातून भारतीय अर्थव्यवस्था सावरत असतानाच आता आलेल्या युरोपियन आर्थिक पेचप्रसंगाचे पडसाद उमटले आहेत. हा आर्थिक पेचप्रसंग लवकर मिटण्याची शक्यता नाही. भारताचा आर्थिक विकास दर मंदावला यात शंकाच नाही. पण, सात टक्के विकास दर हादेखील स्पृहणीय आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले. खुल्या आर्थिक धोरणानंतरच्या ऐश्वर्यामध्येच मंदीची बीजे रोवली गेली, असेही ते म्हणाले.

वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे आयोजित वसंत व्याख्यानमालेत युरोपियन आर्थिक पेचप्रसंग आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम या विषयावर डॉ. नरेंद्र जाधव यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आर्थिक पेचप्रसंगाचे जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा वेध घेतला.

डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, आर्थिक सुधारणेच्या दशकपूर्तीनंतर विकास दर सहा टक्के झाला. त्यानंतरच्या तीन वर्षांत तो आठ टक्के आणि आणखी तीन वर्षांनी नऊ टक्के झाला. चीननंतर भारताने वेगवान अर्थव्यवस्थेमध्ये दुसरे स्थान पटकाविले. २००८ मध्ये आलेल्या वित्तीय आरिष्टामध्ये विकसित देशांकडून भांडवलाचा ओघ आटलरा. परदेशी गुंतवणूक कमी झाल्याने विकास दर घटला. मात्र, विकसित राष्ट्रांच्या तुलनेत प्रतिकारशक्ती चांगली असल्याने भारताची कमी पडझड झाली.

पूर्वीच्या जागतिक मंदीमध्ये बँकिंग क्षेत्रापासून सुरवात होऊन त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. तर, सध्याच्या युरोपियन पेचप्रसंगामध्ये सरकारवरील कर्जाच्या दडपणाचा भार बँकिंग क्षेत्रावर आला आहे. अर्थसंकल्पातील वित्तीय तूट कमी करण्यासाठी कठोर उपाय योजण्याबरोबरच शेतीमधील भांडवली गुंतवणूक वाढविण्याची गरज असल्याचे नरेंद्र जाधव यांनी स्पष्ट केले.

## म्हणून विषय बदलला

वसंत व्याख्यानमालेमध्ये बोलण्याचे निमंत्रण हा आनंदाचा विषय असल्याचे सांगून डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, खरे तर मी भारतीय शेती : दशा आणि दिशा या विषयावर बोलणार होतो. पण, राज्यातील दोन सत्ताधारी पक्षांमध्ये सिंचन, शेती आणि दुष्काळ या विषयांवरुन राजकीय रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे माझ्या भाषणामध्ये व्यक्त झालेल्या मतांना राजकीय रंग येण्याची किंवा तसा तो दिला जाण्याची शक्यता असल्यामुळे संयोजकांच्या परवानगीने मी व्याख्यानाचा विषय बदलला.

# वसंत व्याख्यानमालेला शनिवारपासून प्रारंभ

## शरद पवार, नरेंद्र जाधव, डॉ. अभय बंग सहभागी

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - राजकीय, आंतरराष्ट्रीय प्रश्न, आरोग्य, इतिहास, साहित्य, संस्कृती, चित्रपट, संतसाहित्य, चित्रकला, नागरी समस्या असे विविध विषय हाताळणाऱ्या वसंत व्याख्यानमालेच्या महिनाभराच्या १३८ व्या ज्ञानसत्रास शनिवारपासून (दि. २१) सुरवात होत आहे. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणणारे यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून महाराष्ट्र दिनी (एक मे) केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांचे यशवंतराव चव्हाण : द्रष्टे नेतृत्व या विषयावर व्याख्यान होणार आहे.

हवाई दलाचे माजी उपप्रमुख एअर व्हाईस मार्शल (निवृत्त) भूषण गोखले यांच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि हवाई दलाची भूमिका या विषयावरील व्याख्यानाने यंदाच्या ज्ञानसत्राचे उद्घाटन होणार आहे. टिळक स्मारक मंदिर येथे दररोज सायंकाळी साडेसहा वाजता ही व्याख्यानमाला होणार असून १८ मे हा दिवस युवा वक्त्यांसाठी राखून ठेवण्यात आला आहे, अशी माहिती वक्तृत्वोत्तेजक सभेचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे रोझ सोसायटीतर्फे गुलाब या विषयावरील सर्वांगिण माहिती देणाऱ्या व्याख्यानाने २३ एप्रिल रोजी जयंतराव टिळक स्मृती पुष्प गुंफले जाणार आहे.

मुस्लिम समाज : प्रतिमा आणि वास्तव या विषयावर प्रा. शमसुदीन तांबोळी, न्यायसंस्थेच्या लक्ष्मणरेषा या विषयावर न्या. नरेंद्र चपळगावकर, वाङ्मयीन सद्यस्थिती आणि सामाजिक संस्कृती या विषयावर डॉ. आनंद यादव, भारताची सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थिती या विषयावर अभय फिरोदिया, आंतरराष्ट्रीय सत्ता स्पर्धा आणि चीन या विषयावर डॉ. गो. पु. देशपांडे, गुंतवणुकीची गीता या विषयावर चंद्रशेखर टिळक, रामदर्शन : एक अनुभव या विषयावर चित्रकार सुहास बहुलकर, या जीवनाचं काय करू या विषयावर डॉ. अभय बंग, समाधानी वार्धक्य या विषयावर डॉ. शरश्चंद्र गोखले, नेताजी सुभाषचंद्र बोस या विषयावर आनंद हर्डीकर, बालगंधर्व या चित्रपटाच्यानिमित्ताने अभिनेता सुबोध भावे आणि गायक आनंद भाटे, पुणे २०२० या विषयावर खासदार वंदना चव्हाण, भारतीय शेती- दशा, दिशा आणि भवितव्य या विषयावर डॉ. नरेंद्र जाधव यांची व्याख्याने होतील.

### व्याख्यानमाला फेसबुकवर

यंदा पासून आधुनिकतेची कास धरत वसंत व्याख्यानमाला फेसबुकवर पाहता येणार आहे. व्याख्यानमालेतील युवा वक्ता मंदार कारंजकर हा युवक दररोजच्या व्याख्यानाचा गोषवारा फेसबुक वर अपलोड करणार आहे, असे मंदार बेडेकर यांनी सांगितले.

17-5-12

# युरोपातील आर्थिक संकटाचा फटका भारतालाही बसणार

## नरेंद्र जाधव यांचे मत

पुणे : भारतीय अर्थव्यवस्था ही युरोपीयन आर्थिक संकटाच्या तडाख्यात सापडली असून, मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आर्थिक तूट आणि महागाईमध्ये वाढ, या आव्हानांना भारतीय नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी शेतीच्या क्षेत्रामध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्याबरोबरच तेलाची बचत करणे, भूसंपादनविषयक आणि खनिकर्म व खनिजे या संदर्भातील येणारे नवीन कायदे लवकर संमत होणे आवश्यक असल्याचे मत केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

वक्तृत्वोत्तेजक सभेच्या वतीने आयोजित वसंत व्याख्यानमालेतील कै. सदाशिवराव पिंगळे स्मृती व्याख्यानातील 'युरोपातील आर्थिक पेचप्रसंग आणि भारतावरील परिणाम' या विषयावर ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, की २००८ मध्ये बँकांवरील विश्वासार्हता ढासळल्याने जगभरात आर्थिक मंदीची लाट पसरली होती. युरोपीयन राष्ट्रांचा या मंदीमध्ये ७ टक्क्यांहून आधिक विकासदर ढासळला. मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली होती. त्याचा परिणाम हा विकसनशील देशातील विविध वित्तीय संस्थांनी आपली गुंतवणूक काढून घेण्यास सुरुवात केल्याने विकसित देशांकडून होणारी आर्थिक मदत थांबली. परिणामतः मोठ्या प्रमाणात विकसनशील देशाला वित्तीय संकटाला सामोरे जावे लागले. त्यामुळे विकसनशील देशाला विकासदर हा ८ टक्क्यांवरून तबल २.८ टक्क्यांवर आला. खनिज तेलांच्या दरात वाढ होऊन मोठ्या प्रमाणात महागाई वाढली. मात्र अशाही परिस्थितीत भारताची स्थिती बरी होती. विकासदर मंदावला. मात्र पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था टिकून राहिली.

जगभर २००८ च्या आर्थिक मंदीतून सावरण्यासाठी मौद्रिक निती आणि आर्थिक व्यवहारामध्ये काही मुख्य बदल करण्यात आले. ज्यामुळे वित्तीय संकटात सापडलेल्या वित्तीय संस्थांना उभारणीसाठी शासनाकडून लाखो डॉलर्स किमतीची पॅकेजेस जाहीर करण्यात आली आणि मोठ्या प्रमाणात व्याजाचे दर कमी करण्यात आले.

या काळात भारतातील अनेक उद्योजकांनी आपल्या स्वार्थासाठी देशामध्ये आर्थिक मंदी निर्माण झाली असून, शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. मात्र



त्या काळात अर्थव्यवस्था ही सक्षम होती. त्यामुळे ती टिकून राहिली. मात्र या काळात राष्ट्रीय रोजगार हमी अंतर्गत सामाजिक क्षेत्रात शासनाने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. सहाव्या वेतन आयोगांतर्गत मोठ्या प्रमाणात पगारांमध्ये वाढ करून क्रयशक्तीमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा जरी अनुत्पादक खर्च असला, तरी त्या काळात आवश्यक होता.

२००८ च्या आर्थिक संकटांतून सावरण्यासाठी ज्या उपाययोजना योजण्यात आल्या, त्यामध्येच युरोपीय आर्थिक संकटांची पाळेमुळे रुजल्याचे दिसून येते. कारण सामाजिक क्षेत्रात गुंतवणूक, क्रयशक्तीत वाढ करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तूट निर्माण होऊन पुन्हा एकदा जगातील अर्थव्यवस्थांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले. २००८ मध्ये वित्तीय संस्था या आर्थिक विंवचनेत सापडल्याने आर्थिक मंदी निर्माण झाली होती. या काळात शासनाने पुढे येऊन या संस्थांना सावरले. मात्र युरोपीयन

*अलीकडील काळात धोरण लकवा (पॉलिसी पॅरालिसीस) ची हाकाटी उठविण्यात येत असून, यातून नागरिकांची दिशाभूल होत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला काही काळ आलेली मरगळ असून, प्रत्येकानी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास ही मरगळ दूर करता येत असल्याचे त्यांनी सांगितले.*

आर्थिक संकट हे शासन आर्थिक टंचाईत सापडल्याने निर्माण झाले असून, शासनाची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी वित्तीय संस्था पुढे येताना दिसत नाहीत. त्यामुळे या युरोपीयन आर्थिक संकटांचा फटका युरोझोन देशासह, जगातील सर्व विकसनशील, अविकसित राष्ट्रांना बसणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला यातून सावरण्यासाठी तेलाच्या किमती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करतानाच कमीत कमी आर्थिक तूट करणे आणि तेलाची बचत करणे आवश्यक असून, शेतीमधील भांडवली गुंतवणूक वाढविण्याची गरज आहे. त्याशिवाय नवीन उत्पादन धोरणे आखणे गरजेचे असून, नव्याने तयार करण्यात आलेल्या भूसंपादन आणि खनिजांसंदर्भातील कायदा बनविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# ...तर भारतात उपाययोजनेची गरज

## युरोपातील पेचाच्या परिणामाबाबत नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. जाधव यांचे मत

**पुणे, ता. २०** : युरोपातील आर्थिक पेचप्रसंगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांची तीव्रता कमी करण्यास भारताला अनेक उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यासाठी संसदेत प्रलंबित असलेली 'जमीन अधिग्रहण', 'खाण नियमन' व 'प्रत्यक्ष कर संहिता व सेवा मूल्य कर' ही विधेयके लवकर मंजूर होणे गरजेचे आहे,'' असे मत केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी शनिवारी व्यक्त केले.

वक्तृत्वोत्तेजक सभेच्या वतीने आयोजित वसंत व्याख्यानमालेत 'युरोपियन आर्थिक पेचप्रसंग व



**नरेंद्र जाधव**

त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम' या विषयावर डॉ. जाधव बोलत होते. ते म्हणाले, ''जागतिक अर्थव्यवस्थेत २००८ साली आलेल्या आर्थिक पेचप्रसंगातून सावरण्यासाठी प्रगत देशांनी अनेक उपाययोजना केल्या. त्यातूनच सध्याच्या युरोपातील आर्थिक पेचप्रसंगाची बीजे रोवली गेली. त्याची झळ अनेक देशांना बसत असून, तो आटोक्यात येण्याची अजूनही चिन्हे नाहीत. इतर देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेची पडझड कमी झाली आहे. त्यामुळे काळजी करण्यासारखी परिस्थिती नसली तरीही आर्थिक विकासाचा दर कमी झाला आहे. सरकारवरील कर्जाचा बोजा वाढल्याने युरोपीय देशांमध्ये हे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्याचा थेट फटका बँकिंग क्षेत्राला बसत आहे.''

''युरोपीय बाजारपेठेत सध्या मंदी असल्याने भारतीय निर्यातीचा वेग मंदावला आहे. देशात येणारा भांडवली ओघ कमी झाला असून, देशातील आर्थिक गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे. हे आर्थिक विकासाचा दर कमी होण्याचे एक कारण आहे. देशाचा आर्थिक विकास दर सात टक्क्यांपेक्षा खाली जाण्याची शक्यता आहे. या आर्थिक संकटावर नियंत्रण येईपर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार आहे. त्यातून सावरण्यासाठी अर्थसंकल्पातील तूट कमी करणे, शेतीच्या क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढविणे, विजेच्या क्षेत्रात प्रगती करणे अशा उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याऐवजी लोकांना शेअर बाजार व बँकिंग क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे,'' असेही ते म्हणाले

21-5-12 सकाळ

# भयशून्य चित्त जेथ...

शैक्षणिक उकिरडे (४ एप्रिल) या संपादकीयावर तीव्र आक्षेप नोंदविणारे डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'संपादकीय उकिरडे' हे पत्र (९ एप्रिल) वाचले आणि 'मी, मी, दोडक्याचे बी' वा 'उथळ पाण्याला खळखळाट फार' अशा म्हणींचे तसेच गर्व, अहंभाव, उग्रदर्प या शब्दांचे खरे अर्थ समजले तसेच 'विद्या विनयेन शोभते' हे आजपावेतो मनावर बिंबलेले संस्कार व्यावहारिक जगात नवनवीन पदे हस्तगत करण्यासाठी किती फोल आहेत याची जाणीवही झाली.

स्वयंप्रकाशित ताऱ्याला 'मी तारा आहे, परप्रकाशित ग्रह नाही' किंवा 'माझ्यावर दोन मोठ्या राजकीय पुढाऱ्यांची आदरदृष्टी आहे' असे मुद्दाम सांगावे लागत नाही. प्रोफेशनल भाषेत (कारण ती संबंधितांना आपली वाटते म्हणून) आपण एखाद्या टॉपच्या पदावर पोहोचलो की, पब्लिक डोमेनमध्ये असतो. आपल्या कामगिरीवर अनेकांच्या नजरा असतात आणि आपणास आवडले नाही तरी कामगिरीचे मूल्यमापन होतच असते. लोकशाहीच्या चौथ्या खांबाने जर हे कर्तव्यकार्य सदसद्विवेकबुद्धीने केले तर स्वतःकडे साक्षीभावाने पाहून अंतर्मुख होणे जास्त चांगले! टॉपला गेल्यावर गळ्यातले हार जसे सुख देतात तसे मूल्यमापनाचे काटे विनम्र भाव ठेवल्यास बोचत नाहीत, किंबहुना 'There is always room for improvement' या उक्तीनुसार आत्मचिंतनास उद्युक्त करतात.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी डॉ. मुणगेकर व ते स्वतः यांना एकाच मापाने तोलण्याबाबत 'दोघांची जात एकच' ही सामान्य माणसाकडून वापरली जाणारी ढाल पुढे का करावी असा प्रश्न मनात निर्माण होतो, तसेच मुंबई विद्यापीठाच्या अधोगतीबद्दल डॉ. मुणगेकरांसह अनेक कुलगुरू जबाबदार आहेत हा संपादकांचा दावा देखील ते का मान्य करतात याचे उत्तर मिळत नाही.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी रवींद्रनाथांच्या प्रातिनिधिक कवितांचा अनुवाद 'भयशून्य चित्त जेथ...' या पुस्तकाद्वारे प्रकाशित केला आहे. त्यात पान क्र. ३८१ वर 'ध्यास फक्त तुझा' या कवितेच्या शेवटच्या ओळी आत्मचिंतनासाठी उपयोगी ठरतील असे वाटते.

'अहंकार माझा नाही सोडीयला
धरूनी मी त्याला आहे रे भटकत।
अहंकार सोडीन जेव्हा मुक्त मी होईन
मनी ध्यास तुझा जाणतो मी, रे।'

याच ग्रंथात पान क्र. ४२३ वर 'चिरपरिचित' नावाच्या कवितेत जन्म आणि मृत्यू याबाबत सूचक ओळी पुढीलप्रमाणे आहेत.

'बाळ रडून उठे जेव्हा माता काढी उजवा पान्हा
डावा तोचि दिलासा देई लगोलग, लुचत्या बाळा'

आपल्यावर होणारी टीका मरणप्राय वेदना देणारी असली तरी जन्माप्रमाणेच मृत्यू जसा दिलासा देतो, तशीच टीकादेखील आत्मशुद्धीसाठी मार्ग दाखविणारी असते हे मोठ्या माणसांनी जाणण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा मार्गक्रमणासाठी हार्दिक शुभेच्छा!

**-अनिल राव,**
जळगाव.

# जाधव यांची तळमळ वादातीत

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कारकीर्द निरनिराळ्या अधिकारमंडळांचा सदस्य म्हणून मी जवळून पाहिलेली आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांनी पुणे विद्यापीठाच्या विकासासाठी तळमळीने काम केले, याबद्दल कोणाचेही दुमत होण्याचे कारण नाही.

पुणे विद्यापीठातील सुमारे ४०० अभ्यासक्रमांचे पुनर्लेखन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या आग्रहामुळे झाले. याबाबतीत त्यांनी अनेक वेळेला निरनिराळ्या अभ्यासमंडळांचे निरनिराळ्या विद्याशाखांचे अध्यक्ष, अधिष्ठाते यांच्या बैठका बोलावून हे पुनर्लेखनाचे काम पार पाडले. कुलगुरूंनी सर्वच अभ्यासक्रमांचे पुनर्लेखनामध्ये रस घेतल्याचे हे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण म्हणावे लागेल. पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकांना त्याचप्रमाणे विद्यापरिषदेच्या बैठकांना व त्यातील चर्चांना त्यांनी आपल्या कारकिर्दीत मोठे महत्त्व दिले. अनेक कुलगुरूंना अधिसभेचे अस्तित्व त्रासदायक वाटू लागले आहे. परंतु डॉ. जाधव यांच्या कारकिर्दीत पुणे विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झालेली आहे. अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये एखादी कपात सूचना आवडल्यास ती कपात सूचना स्वीकारण्याचे धैर्य दाखविणारे डॉ. जाधव हे पहिलेच कुलगुरू असावेत.

विद्यापीठाचा परीक्षा विभाग हा सर्वांत जास्त संवेदनशील विभाग आहे. परीक्षामंडळ हे परीक्षाविषयक काम करणारे महत्त्वाचे अधिकार मंडळ आहे. या अधिकार मंडळाच्या कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याचे त्यांनी मनापासून खूप प्रयत्न केले. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या कुलगुरूपदावरील कार्याचे मूल्यमापन सकारात्मक दृष्टिकोनातून करावे असे वाटते.

**- डॉ. गजानन एकबोटे, पुणे**

18-5-12 लोकसत्ता

चिंतन इमेज मेकर्स

# खुल्या अर्थव्यवस्थेच्या ऐश्वर्यातच मंदीची बीजे : डॉ जाधव

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) - जागतिक आर्थिक मंदीच्या संकटातून भारतीय अर्थव्यवस्था सावरत असतानाच आता आलेल्या युरोपियन आर्थिक पेचप्रसंगाचे पडसाद उमटले आहेत. हा आर्थिक पेचप्रसंग लवकर मिटण्याची शक्यता नाही. भारताचा आर्थिक विकास दर मंदावला यात शंकाच नाही. पण, सात टक्के विकास दर हादेखील स्पृहणीय आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले. खुल्या आर्थिक धोरणानंतरच्या ऐश्वर्यामध्येच मंदीची बीजे रोवली गेली, असेही ते म्हणाले.



वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे आयोजित वसंत व्याख्यानमालेत युरोपियन आर्थिक पेचप्रसंग आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम या विषयावर डॉ. नरेंद्र जाधव यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आर्थिक पेचप्रसंगाचे जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा वेध घेतला.

डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, आर्थिक सुधारणेच्या दशकपूर्तीनंतर विकास दर सहा टक्के झाला. त्यानंतरच्या तीन वर्षांत तो आठ टक्के आणि आणखी तीन वर्षांनी नऊ टक्के झाला. चीननंतर भारताने वेगवान अर्थव्यवस्थेमध्ये दुसरे स्थान पटकाविले. २००८ मध्ये आलेल्या वित्तीय आरिष्टामध्ये विकसित देशांकडून भांडवलाचा ओघ आटलरा. परदेशी गुंतवणूक कमी झाल्याने विकास दर घटला. मात्र, विकसित राष्ट्रांच्या तुलनेत प्रतिकारशक्ती चांगली असल्याने भारताची कमी पडझड झाली.

पूर्वीच्या जागतिक मंदीमध्ये बँकिंग क्षेत्रापासून सुरवात होऊन त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. तर, सध्याच्या युरोपियन पेचप्रसंगामध्ये सरकारवरील कर्जाच्या दडपणाचा भार बँकिंग क्षेत्रावर आला आहे. अर्थसंकल्पातील वित्तीय तूट कमी करण्यासाठी कठोर उपाय योजण्याबरोबरच शेतीमधील भांडवली गुंतवणूक वाढविण्याची गरज असल्याचे नरेंद्र जाधव यांनी स्पष्ट केले.

## म्हणून विषय बदलला

वसंत व्याख्यानमालेमध्ये बोलण्याचे निमंत्रण हा आनंदाचा विषय असल्याचे सांगून डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, खरे तर मी भारतीय शेती : दशा आणि दिशा या विषयावर बोलणार होतो. पण, राज्यातील दोन सत्ताधारी पक्षांमध्ये सिंचन, शेती आणि दुष्काळ या विषयांवरुन राजकीय रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे माझ्या भाषणामध्ये व्यक्त झालेल्या मतांना राजकीय रंग येण्याची किंवा तसा तो दिला जाण्याची शक्यता असल्यामुळे संयोजकांच्या परवानगीने मी व्याख्यानाचा विषय बदलला.

प्रभात
२०/५/१२

# 'एनएसएस' स्वयंसेवक होणार 'रोजगारक्षम'

## कॅम्पसवरच डिप्लोमा अभ्यासक्रमाची सुविधा

**योगेश बोराटे** ■ पुणे
matapune@indiatimes.com

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केवळ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रस्तासफाई, रंगरंगोटी अशी दिखाऊ कामे न करता रोजगाराभिमुख प्रशिक्षण प्राप्त करणेही आता शक्य होणार आहे. 'एनएनएस'च्या माध्यमातून कॉलेज कॅम्पसवर पदविका अभ्यासक्रम करण्याची सुविधा नवीन केंद्रीय धोरणामुळे प्राप्त होणार असून, राज्यातील सुमारे तीन लाखांहून अधिक 'एनएसएस - स्वयंसेवकां'ना ही संधी मिळणार आहे.

'नॉट मी, बट यू' असा सेवाभावी संदेश देणारी 'एनएसएस' आता 'लर्न टू सर्व्ह, सर्व्ह टू लर्न'चा नारा देत रोजगारक्षम युवा पिढीही या योजनेच्या माध्यमातून घडविणार आहे.

केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठाच्या

> "थेट समाजात जाऊन काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी ही योजना आहे"
>
> **प्रा. एस. परशुरामन,** संचालक, टीआयएसएस

**मटा विशेष**

सेवा योजनेचे माजी समन्वयक डॉ. संजय चाकणे 'रिप्रोसेसिंग एनएसएस' या प्रस्तावावर काम करीत आहेत. मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीआयएसएस)आणि केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या माध्यमातून 'एनएसएस'ची चळवळ कालसुसंगत करण्यासाठी विविध योजना आखल्या जात आहेत.

सेवा योजनेच्या बदलत्या संदर्भाबाबत 'टीआयएसएस'चे संचालक प्रोफेसर एस. परशुरामन यांनी 'मटा'ला माहिती दिली. ते म्हणाले, 'कॉलेजांमधून विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत असले, तरी त्यांच्यामध्ये उद्योजकतेसाठी आवश्यक गुणांचा विकास होतोच असे नाही. सेवा योजनेचे स्वयंसेवक मात्र त्याला अपवाद ठरणार आहेत. थेट समाजामध्ये जाऊन काम करण्याचा अनुभव त्यांना मिळावा यासाठी ही योजना आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून चार-पाच विद्यापीठांमध्ये त्याचा प्रारंभ होत आहे.'

'एनएसएसमध्ये 'इनोव्हेशन' आणणारा हा प्रस्ताव आहे. गेल्या ४२ वर्षांपासून सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये त्यायोगे कालानुरूप सुधारणा होणार आहेत. जलसंधारण, सॉफ्ट स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण पुरविण्यात येणार आहे,' असे पुणे विद्यापीठाच्या एनएसएस कार्यक्रम समन्वयक डॉ. शाकिरा इनामदार यांनी सांगितले.

मटा. टाईम्स
9/5/12

# दिल्ली येथील डॉ. आंबेडकर स्मारक समितीचा अहवाल सादर

पुणे/प्रतिनिधी

नोव्हेंबर १९५१ ते डिसेंबर १९५६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिल्लीच्या ज्या जागेत वास्तव्य केले आणि त्यांचे जिथे महापरिनिर्वाण झाले त्याठिकाणी डॉ आंबेडकरांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल बुधवारी केंद्रिय सामाजिक न्याय व कल्याण मंत्री मुकुल वासनिक यांना सादर केला. यासाठी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या आदेशावरुन केंद्रिय नियोजन आयोग व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पाच महिन्यांपूर्वी सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने ही विशेष समिती नेमण्यात आली होती.

त्यामुळे या ठिकाणी उभारण्यात येणारे राष्ट्रीय स्मारक बौद्ध वास्तुशास्त्राच्या पद्धतीने बांधण्यात यावे, अशी शिफ़ारस डॉ. जाधव यांच्या समितीने केली आहे. उच्चस्तरीय समितीने तयार केलेल्या मास्टर प्लॅनमध्ये डॉ. आंबेडकरांचा जीवनपट उलगडणारी छायाचित्र प्रदर्शनी त्याचप्रमाणे नागपूरची दिक्षाभूमी, मुंबईचे राजगृह तसेच चैत्यभूमी यांच्या प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. त्याशिवाय ध्यान सभागृह, माहिती केंद्र व चलतचित्र सभागृह यांचा समावेश असणार आहे. सभोवतालच्या मोकळ्या जागेमध्ये डॉ. आंबेडकरांचा भव्य पुतळा, बोधीवृक्ष, बोधीसत्व भीमस्तंभ, बोधीसत्व भीमज्योती इत्यादींची उभारणी करण्यात येणार असून तिथे लाईट आणि साऊंड शो आयोजित करता येऊ शकतील असे समितीने सुचविले आहे.

डॉ. आंबेडकरांवर बौद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव असल्यामुळे महापरिनिर्वाण भूमीवर उभारण्यात येणाऱ्या सर्व वास्तूंचे बांधकाम बौद्ध वास्तुशास्त्रानुसारच करण्यात यावे, अशी आग्रही मागणी सदर अहवालात करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी १२५ कोटी रुपये मंजूर करण्याची महत्वपूर्ण शिफ़ारस देखील डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या उच्चस्तरीय समितीने केली आहे.

चिंतन इमेज मेकर्स

पुण्यनगरी
11/5/12